# बालकाण्ड

ह. मो. मराठे

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**बालकाण्ड**
ह. मो. मराठे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
ह. मो. मराठे
६०७, 'ओ' इमारत पिनाक मेमरीज,
कोकण एक्स्प्रेसच्या गल्लीत, कोथरुड, पुणे- ३८
फोन नं. ०२०-२५४३७५३० मो.नं. : ९४२३०१३८९२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४२०/-

# बालकाण्ड

माझ्या बालपणाची ही कहाणी
आईवडिलांखेरीज
दुसऱ्या कोणाला
अर्पण करणार?

**– ह. मो. मराठे**

## लेखकाचे प्रास्ताविक

'बालकाण्ड'ची ही नवी आवृत्ती कोल्हापूरचे 'रिया पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहता हे 'जन आवृत्ती' या रूपात प्रसिद्ध करीत आहेत. त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पूर्वीच्या आवृत्त्या 'मॅजेस्टिक प्रकाशन'चे श्री. अशोक कोठावळे यांनी प्रसिद्ध केल्या होत्या. मी त्यांचाही आभारी आहे.

हे आत्मचरित्र नाही. कारण, आत्मचरित्राची बैठक आणि हेतू वेगळा असतो. आत्मचरित्र मोठ्या कर्तबगारीची माणसं लिहितात.

ही कादंबरी नाही. कारण, कादंबरीत सर्व काही काल्पनिक आहे, हे लेखकानं, तसंच वाचकानंही गृहीत धरलेलं असतं.

हे आत्मकथन नाही. कारण, आत्मकथनं ही आपल्यावर समाजाकडून झालेल्या अन्यायाची कैफियत मांडण्यासाठी लिहिली जातात.

याला आत्मचरित्रात्मक कादंबरीही म्हणता येईलसं वाटत नाही.

याला मी आत्मकहाणी असं म्हणेन पण आत्मकथा म्हणणार नाही. कारण, म. गांधींची 'आत्मकथा' फार प्रसिद्ध आहे.

ही माझ्या बाळपणाची गोष्ट आहे. बाळपण कधी आपलं एकट्याचं नसतं. ते सर्व कुटुंबाचं असतं. आई, वडील, भावंडं, परिसर यांचंही असतं. गोष्टीत तेही येतातच.

ही गोष्ट मी कादंबरीच्या ढंगात सांगितली आहे. पण काल्पनिक घटना-प्रसंगांची जोड न देता.

हे सगळं काही मला नीट आणि क्रमवार आठवत नव्हतं.

काही वर्षांपूर्वी माझ्या थोरल्या भावाची एक वही मला सापडली. त्याने त्या वहीत आपल्या आयुष्याचा घटनाक्रम थोडक्यात पण क्रमवार लिहून ठेवला होता. ती वही वाचल्यानंतर आणि त्याच्याशी बोलल्यानंतर मला आमच्या आयुष्यातील अनेक घटना नीट समजल्या, घटनांचा क्रम समजला.

काही घटनांमागची कारणंही समजली. पुष्कळ वर्षांपूर्वी (१९७०) 'अभिरुची'च्या दिवाळी अंकात मी 'सुर्ल' नावाचा एक ललित लेख लिहिला होता. तो वाचलेले तिघेच मला आजवर भेटले. एक मधु मंगेश कर्णिक आणि दुसरे प्रा. रवींद्र घवी तिसरे राम कोलारकर. गोव्यातील साखळीजवळ असलेल्या सुर्ल या गावी आम्ही काढलेल्या दिवसांचं वर्णन त्या लेखात होतं. भावाची वही वाचल्यानंतर वाटलं की अनेक गोष्टींचा थोडा अधिक उलगडा झाल्याने आणि घटनाक्रम अधिक तपशिलात समजल्याने आता आपल्या बाळपणाची गोष्ट सविस्तर लिहायला हरकत नाही.

माझा थोरला भाऊ म्हणजे देवदास मोरेश्वर मराठे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण या गावातील देऊळवाडा या भागात तो रहात असे. सध्या तो सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ या गावी रहातो. त्याला बाबल मराठे म्हणून लोक ओळखतात. त्याचा कपडे शिवण्याचा व्यवसाय होता. तो त्याने आता बंद केला आहे.

'बालकाण्ड' लिहून झाल्यानंतर हस्तलिखित त्याला वाचायला दिलं. घटनाक्रमातील एक-दोन दुवे त्याने माहितीच्या दृष्टीने स्पष्ट केले. म्हणाला, ''तुला हे कादंबरीच्या पद्धतीने लिहायचं असल्याने काही घटना, प्रसंग तू तसे लिहिले आहेस, पण मुळात सगळं असंच घडलं आहे.''

माझे मित्र, अनुभवी संपादक, साहित्याचे जाणकार वाचक आणि सहृदय समीक्षक शंकर सारडा यांना हस्तलिखित वाचायला दिलं आणि विचारलं, ''हे कोणा प्रकाशकाला दाखवू का?'' त्यांनी होकार देताच सर्वात आधी अशोक कोठावळे यांना वाचायला दिलं. ते म्हणाले, ''मी प्रकाशित करतो.''

मुद्रिते तपासताना मनोहर बोर्डेकर यांनी मला ज्या सूचना केल्या त्या एखाद्या कुशल ग्रंथसंपादकानं कराव्या अशा महत्त्वाच्या होत्या.

या गोष्टीत मी अनेक भाषांचा/बोलींचा वापर केला आहे. माझे वडील, आई, आमची चुलत, आत्ते भावंडं वगैरेंच्या तोंडी जी भाषा आहे तिला 'चित्पावनी' म्हणतात. द. कोकण, गोवा इकडल्या चित्पावन ब्राह्मणांच्या घरात ती बोलली जाई. नागर मराठीचा परिचय होईपर्यंत मी, भाऊ हीच भाषा बोलत असू. ती बोलणारे, समजणारे आता फारसे लोक नाहीत. प्रमाण मराठीचा परिचय शाळाबिळा सुरू झाल्यानंतर झाला. चित्पावनीखेरीज सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोलली

जाणारी मालवणी, गोव्याची कोकणी यांचाही वापर यात आहे. गोव्याची कोकणी मला आता नीट येत नाही. काही प्रसंगी गोव्याच्या कोकणीसाठी मी माझे साहित्यिक मित्र कै. सुभाष भेण्डे यांची मदत घेतली होती.

मराठी वाचकांनी 'बालकाण्ड'चे उत्स्फूर्तपणे आणि मनापासून स्वागत केले. 'केशवराव कोठावळे पारितोषिक', 'भैरूरतन दमाणी पुरस्कार' हे दोन पुरस्कार 'बालकाण्ड'ला लाभले. काही ठिकाणी चर्चा, परिसंवाद झाले. त्यात नामवंत व्यक्तींनी 'बालकाण्ड'बद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. बहुतेक सर्व वर्तमानपत्रांनी, नियतकालिकांनी अभिप्राय दिले. अनेकांनी अगदी उत्स्फूर्तपणे 'बालकाण्ड'बद्दल सविस्तर लेख लिहिले. गोव्यात (साखळी) सुर्ल येथे तर एक दिवसाचे 'बालकाण्ड साहित्य संमेलन' झालं. २००१ सालचं सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणून 'ललित'च्या चोखंदळ वाचकांनी प्रथम क्रमांकाची पसंती 'बालकाण्ड'ला दिली होती. गोव्यातली अडीच-तीनशे साहित्यप्रेमी मंडळी त्या लहानशा खेड्यात जमली होती. गोवा विद्यापीठाने मराठीच्या अभ्यासक्रमातही 'बालकाण्ड'चा समावेश केला.

मला 'कोकण मराठी साहित्य परिषदे'ने 'कोकण साहित्य भूषण' हा पुरस्कार दिला. तोही 'बालकाण्ड' आणि (पुढला भाग) 'पोहरा' विचारात घेऊनच दिला असावा.

'बालकाण्ड'चा पुढला भाग मी 'पोहरा' या नावाने लिहिला. त्याचीही नवी 'जन आवृत्ती' श्री. शितल मेहता प्रसिद्ध करीत आहेत.

'बालकाण्ड' आणि 'पोहरा' या दोन पुस्तकांविषयी विद्वान समीक्षकांनी, तसेच सामान्य वाचकांनी लिहिलेल्या लेखांचे आणि पत्रांचे अंक पुस्तक मी अलिकडेच छापत आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे ''बालकाण्ड' आणि 'पोहरा': समीक्षा आणि समांतर समीक्षा'. सर्व सामान्य वाचकांनी पत्रांतून केलेले मतप्रदर्शन ही समांतर समीक्षाच असते, असे माझे मत आहे.

मराठीतल्या दलितांच्या आणि स्त्रियांच्या आत्मकथनांना सामाजिक आशयाचं मोठं परिमाण आहे. ती लिहितानाही त्यांची भूमिका आपल्या जगण्याचा सामाजिक आशय प्रकट करण्याचीच असते. तसं कोणतं परिमाण माझ्या आत्मकहाणीला नाही. ही तशी वैयक्तिक स्वरूपाची कहाणी आहे.

पण, शोधलं तर एक सामाजिक परिमाण माझ्या आत्मकहाणीलाही जाणवू शकेल. ब्राह्मणांना (यात लेखक, पत्रकार, व्यावसायिक, अधिकारी, कलाकार इत्यादी सर्व आले.) सर्व काही आयतं मिळालं, त्यांना कष्ट उपसावे लागले नाहीत, त्यांना अभावग्रस्त जीवनाचा अनुभव घ्यावा लागला नाही, त्यांचं जीवन म्हणजे सुरक्षित कवचातलं गुळगुळीत जीवन, त्यांनी भूमिका पार पाडली ती सामाजिक शोषकाची अशी अनेक दलितसमाजी आणि बहुजनसमाजी लेखकांची तसंच विचारवंतांची समजूत असल्याचं अलीकडे अनेकदा आढळतं. या समजुतीला किंचितसाही धक्का बसला तरी ती माझ्या आत्मकहाणीची एक फलश्रुतीच समजावी लागेल. आधीच अनेकजातीय आणि अनेकधर्मी असलेल्या भारतीय समाजाला राजकारण आणि तथाकथित लोकशाहीसाठी आवश्यक अशा निवडणुका तसंच जातीवर आधारलेलं आरक्षण यांनी जातीय विद्वेषाच्या ज्वालामुखीवर आणून उभं केलं आहे. या ज्वालामुखीचा स्फोट व्हायला नको असेल तर जातीजातीत निर्वैर असं सामंजस्य निर्माण होणं निकडीचं झालं आहे.

'बालकाण्ड'च्या प्रस्तावनेत लिहिलेल्या माझ्यावरील विचारामुळे अनेक पुरोगामी वाचक माझ्यावर काहीसे रागावले. पण जसजसा काळ जातो आहे तसंच माझ्यावरील प्रतिपादन अधिकाधिक खरं ठरत चालल्याचं अनुभवाला येत आहे. भारतीय समाजातून जातीपाती नाहीशा होण्याची शक्यता नजिकच्या भविष्यकाळात तरी नाही. उलट, जाती अधिकाधिक घट्ट होत चालल्या असून, जातजाणिवांना काटे फुटू लागले आहेत. या परिस्थितीत तर माझं वरील प्रतिपादन (२००१ मध्ये लिहिलेलं) मला अधिकच कालोचित वाटू लागलं आहे.

**पुणे ३८** **– ह. मो. मराठे**

**१ मे २०१६**

✦✦✦